# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 17/02/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### खून

**पो.स्टे. रामटेक :–** अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा–आमडी येथे दिनांक १६/०२/२०२३ चे २०.०० वा. ते दि. १७/०२/२०२३ चे ०५.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– चैतराम भांलचंद बसोले, वय ५७ वर्ष, रा. आमडी ता. पारशिवनी जि. नागपूर यांनी पोस्टे रामटेक येथे दिलेल्या रीपोर्ट वरून त्यांचे राहते घरी गाईम्हशीं असल्याने दुधाचा व्यवसाय असुन त्यांनी मृतक व आरोपी नामे– मधुकर धोबा युवनाती वय ५३ वर्ष, रा. निमतलाई कोथुर्णा ता. सावनेर याला दरमहा ६०००/–रू. पगाराने कामावर ठेवले होते. तो फिर्यादीचे घराला लागुन असलेल्या एका खोलीत एकटाच राहात असुन नेहमी दारू पिण्याच्या सवयीचा होता. दिनांक १७/०२/२०२३ रोजी पहाटे ५.३० वा. फिर्यादीने आरोपी मधुकरचे घराचे आत जावून पाहीले असता मधुकर हा फासी लागलेला दिसला. व त्याचे बाजूला खाटेचे खाली त्याची पत्नी कुसुमबाई ही रक्ताच्या थारोळयात जमिनीवर पडलेली होती. आरोपी नामे– मधुकर धोबा युवनाती याने त्याची पत्नी सौ. कुसुमबाई वय अंदाजे ४३ वर्ष हिचे सोबत शरीरसंबंधाचे कारणावरून झगडा भांडण करून तिला कुऱ्हाडीने मारून जिवानीशी ठार केले व पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने कुऱ्हाड बाजुच्या तलावात नेवुन टाकले तसेच स्वत: दोरीच्या साहाय्याने गळफास लावुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, २०१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक हदयनारायण यादव पो.स्टे. रामटेक मो. क्र. ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

### दरोडा

**पो.स्टे. मौदा :–**अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा माथनी टोलनाका समोर भंडारा ते नागपुर रोड माथनी शिवार येथे दिनांक १७/०२/२०२३ चे ००.१५ वा. ते दिनांक १७/०२/२०२३ चे ००.३० वा. दरम्यान अनोळखी सात आरोपीतांनी पांढऱ्या रंगाचे कार मध्ये येवुन ट्रक क्र. डब्ल्यु बी.–२५/जे–५१५६ चा चालक फिर्यादी नामे– किशोर गणेश मंडल, वय ३२ वर्ष, रा. गोकुलपुर पोलीस स्टेशन स्वरूपनगर जि. नार्थ २४ परगना (पश्चिम बंगाल) व त्याचे सोबत असलेला कंडक्टर यांचे हातपाय बांधुन मारहाण करून त्यांना कार मध्ये नेवुन पो.स्टे कन्हान हद्दीत शेत शिवार येथे फिर्यादीस हातपाय बांधलेल्या अवस्थेत सोडले व त्याचे सोबत असलेल्या कंडक्टर यास काही अंतर समोर नेवुन बोरीचे झाडाला बांधुन त्यांचे १) ट्रक क्र. डब्ल्यु बी.–२५/जे–५१५६ किंमती अंदाजे २०,००,०००/–रू २) बारीक काळी चुरी (डस्ट) किंमती अंदाजे ४,५०,०००/–रू ३) एक विवो कंपनीचा व एक ओपो कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे १०,०००/–रू ४) नगदी १५,५००/–रू असा एकुण २४,७५,५००/–रूपयाचा मुद्देमाला सहित घेवुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९५ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक हेमंतकुमार खराबे पोलीस स्टेशन मौदा मो. क्र. ९९२३४३८३५५ हे करीत आहे.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड** :— फिर्यादी नामे— यादवराव चंपराव वाडबुधे, वय ५६ वर्ष, रा. पोरगव्हान ता. वरूड जि. अमरावती यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. २५८/२०२० कलम ३०२, २०१, ३४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील नमुद आरोपी नामे— १) राजेंद्र उर्फ बडया रघुनाथ बडघरे, २) उमेश उर्फ कुलटा विनोदराव जैन दोन्ही रा. मोवाड ता. नरखेड यांनी संगनमत करून अज्ञात कारणावरून यातील मृतक नामे— रामराव महादेव बनाईत वय ५२ वर्ष यांच्या सोबत झगडा भांडण करून काठी व लाकडी दांडयाच्या फावडयाने डोक्यावर, हातावर व कपाळावर जबर मारहाण करून जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक मल्लीकार्जुन इंगळे पोस्टे नरखेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक १७/०२/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. देशमुख न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भांदवि मध्ये दोन्ही आरोपीस आजिवन कारावास व प्रत्येकी १०,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. जिकार यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ सुरेंद्र ठाकुर पोलीस स्टेशन नरखेड यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**